# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती)

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ संकेतस्थळ : www.mahagenco.in

## जाहीर सूचना

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या आर्थिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ चे अंतिम समायोजन; आर्थिक वर्ष २०२२-२३ चा वार्षिक कामगिरी आढावा व तात्पुरते समायोजन आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता सुधारित एकूण महसुलाची आवश्यकता व सुधारित वीजदर तसेच प्रस्तावित भुसावळ संच क्रमांक ६ करीता तात्पुरता वीजदर यांच्या मंजुरी करिता सादर केलेल्या याचिकेवर (प्रकरण क्रमांक २२७/२०२२) सूचना/अभिप्राय/हरकत मागवणेबाबत.**

१. महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीने आर्थिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ च्या अंतिम समायोजनासाठी ; आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या तात्पुरत्या समायोजनासाठी आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी सुधारित एकूण महसुलाची आवश्यकतेच्या मंजुरीसाठी तसेच प्रस्तावित भुसावळ संच क्रमांक ६ करीता तात्पुरता वीजदर यांच्या मंजुरी करिता विद्युत कायदा २००३ च्या कलम ६१ आणि ६२ नुसार आणि माननीय आयोगाच्या वीजदर नियमानुसार मध्यावधी पुनरावलोकन (MTR) याचिका दाखल केली आहे.

२. मा.आयोगाने हि याचिका **२६ डिसेंबर २०२२** रोजी दाखल करून विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६४ (२) च्या अंतर्गत महानिर्मितीने जाहीर सूचना प्रसिद्ध करावी व याचिकेवर अभिप्राय/हरकती मागवण्यात याव्या असे निर्देश दिले आहेत.

३. याचिकेतील ठळक मुद्दे पुढील प्रमाणे आहेत.

**तक्ता क्र.१: आ.व.२०१९-२०, आ.व. २०२०-२१,२०२१-२२ आणि २०२२-२३ करीता औष्णिक विद्युत केंद्राचे संचलन मापदंड (एकत्रित)**

| तपशील | आ.व. २०१९-२० | | आ.व. २०२०-२१ | | आ.व. २०२१-२२ | | आ.व. २०२२-२३ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मंजूर केलेले | प्रत्यक्ष | मंजूर केलेले | प्रत्यक्ष | मंजूर केलेले | प्रत्यक्ष | मंजूर केलेले | प्रस्तावित |
| उपलब्धता (%) | ८३.२८ | ६९.८० | ८३.३९ | ७५.२१ | ८३.३९ | ६७.२७ | ८३.३९ | ७२.६३ |
| सयंत्र भारांक (%) | ६७.१३ | ५६.५४ | ७१.८१ | ५७.९२ | ७१.८१ | ४५.५६ | ७१.८१ | ७१.४२ |
| एकूण वीजनिर्मिती (द.ल.यु) | ६१,०४२.६८ | ४८,२३८.४२ | ६३,५८०.१४ | ४५,८८८.१७ | ६३,५८०.१४ | ४९,६९७.३० | ६३,५८०.१४ | ६३,२६२.४४ |
| निव्वळ वीजनिर्मिती (द.ल.यु) | ५६,४९७.२४ | ४४,२७३.४९ | ५८,८५८.१५ | ४२,२००.९२ | ५८,८५८.१५ | ४५,५३७.८३ | ५८,८५८.१५ | ५८,२२१.३६ |

**तक्ता क्र.२. आ.व.२०१९-२०, आ.व. २०२०-२१,२०२१-२२ आणि २०२२-२३ करीता जलविद्युत केंद्रांचे संचलन मापदंड (एकत्रित)**

| तपशील | आ.व. २०१९-२० | | आ.व. २०२०-२१ | | आ.व. २०२१-२२ | | आ.व. २०२२-२३ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मंजूर केलेले | प्रत्यक्ष | मंजूर केलेले | प्रत्यक्ष | मंजूर केलेले | प्रत्यक्ष | मंजूर केलेले | प्रस्तावित |
| एकूण वीजनिर्मिती (द.ल.यु) | ४,०२१.८७ | ४,५६०.९५ | ४,३०७.७६ | ४,०४९.१९ | ४,३०७.७६ | ४,५१४.२८ | ४,३०७.७६ | ४,३३३.८६ |
| निव्वळ वीजनिर्मिती (द.ल.यु) | ३,९८९.६३ | ४,५२९.६९ | ४,२६२.३१ | ४,०१७.७५ | ४,२६२.३१ | ४,४८२.३८ | ४,२६२.३१ | ४,२९६.३४ |

**तक्ता क्र.३. आ.व.२०१९-२०, आ.व. २०२०-२१ आणि २०२१-२२ करिता अंतिम समायोजन व आ.व. २०२२-२३ करिता तात्पुरते समायोजन (रुपये कोटी)**

| अ. क्र. | तपशील | आ.व. २०१९-२० | | आ.व. २०२०-२१ | | आ.व. २०२१-२२ | | आ.व. २०२२-२३ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | * मंजूर केलेले | मागणी केलेले | * मंजूर केलेले | मागणी केलेले | * मंजूर केलेले | मागणी केलेले | * मंजूर केलेले | मागणी केलेले |
| अ | खर्च | | | | | | | | |
| १ | इंधन संबंधित खर्च | १६,७८२.२५ | १३,३९४.६१ | १६,६३५.४४ | ११,९०२.५८ | १७,०५८.१९ | १३,१७०.६३ | १७,४९२.४२ | २१,७९५.२६ |
| २ | संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च | ३,०३३.५६ | ३,२००.४३ | ३,३९२.६९ | ३,१७०.८७ | ३,२३८.५९ | ३,२२३.५० | ३,३२०.२० | ३,७५०.७० |
| ३ | घसारा | २,०००.३४ | २,०७९.३६ | २,०८७.२४ | २,१२२.५६ | २,१५३.४० | १,८८०.१६ | २,०५०.७५ | २,०३८.७० |
| ४ | कर्जाऊ भांडवलावरील व्याज | १,८२९.३८ | १,८९१.९३ | १,७०३.३६ | १,७५७.०३ | १,५६९.९५ | १,५५२.७२ | १,४१७.९६ | १,४४०.१० |
| ५ | खेळत्या भांडवलावरील व्याज | ६५३.८१ | ५६४.९८ | ६५०.७० | ५१८.८७ | ६५५.१३ | ५०४.१५ | ६६१.९० | ७५१.२० |
| ६ | इतर खर्च: | ३६०.७४ | २०२.४३ | ३४५.९९ | २३८.८९ | ३४५.९९ | २७८.१७ | ३४५.९९ | २७८.१७ |
| ७ | आयकर | - | | | | | | | |
| ८ | भाग भांडवला वरील परतावा | १,६५०.६० | १,६८५.५५ | १,५४०.१५ | १,६००.६२ | १,५८६.४३ | १,६१७.७३ | १,६२०.५४ | १,६२७.२८ |
| ९ | जल भाडे पट्टी आकार | ५८०.७१ | ५८०.७१ | ५६७.३२ | ५६६.०५ | ५५५.८४ | ५५३.७० | ५५५.८४ | ५४१.१९ |
| १० | राखीव संच क्षमता आकार | १९.७३ | ३६.२६ | | - | | | | |
| ११ | एकूण महसुलाची आवश्यकता | २६,९११.१२ | २३,६३६.२६ | २६,९२२.८९ | २१,८७७.४७ | २७,१६३.५३ | २२,७८०.७७ | २७,४६५.६० | ३२,२२२.६१ |
| १२ | इंधन खर्च, संचलन आणि सुव्यवस्था खर्चाच्या कारणास्तव होणाऱ्या नफा/तोट्याची विभागणी | | ३२१.९१ | | २७६.४७ | | ७९३.४३ | | |
| १३ | नफा/(तोटा) विभागून घेतल्यावर निव्वळ हक्क | २६,९११.१२ | २३,९५८.१७ | २६,९२२.८९ | २२,१५३.९४ | २७,१६३.५३ | २३,५७४.१९ | २७,४६५.६० | ३२,२२२.६१ |
| १४ | वजा:वीज विक्री सोडून इतर उत्पन्न | ९९.१२ | ८३.७१ | ९९.१२ | ५२.१५ | ९९.१२ | १३३.०७ | ९९.१२ | २६०.२७ |
| १५ | प्रमाणित उपलब्धता न गाठल्यामुळे वार्षिक स्थिर आकारातील घट | १,०८५.८९ | १,५४३.९९ | १,२८८.४३ | ९५०.३८ | १,२६७.७९ | १,६८२.६८ | १,२६१.६९ | १,१२३.६५ |
| १६ | **निव्वळ एकत्रित महसुलाची गरज (अ)** | **२५,७२६.११** | **२२,३३०.४७** | **२५,५३५.३४** | **२१,१५१.४१** | **२५,७९६.६२** | **२१,७५८.४४** | **२६,१०४.७९** | **३०,८३८.६९** |
| १७ | **वीज विक्री महासुलातून मिळालेले उत्पन्न (ब)** | **२५,७२६.११** | **२१,९८५.०४** | **२५,५३५.३४** | **२०,१२२.१०** | **२५,७९६.६२** | **२१,१८६.९७** | **२६,१०४.७९** | **३१,९६२.३४** |
| १८ | **महसुलातील तफावत वाढ /(अतिरिक्त) = अ - ब** | | **३४५.४४** | | **१,०२९.३१** | | **५७१.४८** | | **-१,१२३.६५** |

*** बहुवार्षिक वीजदर याचिके मध्ये मंजूर**

४. मा. आयोगास **''महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीने''** महसुलातील तफावत व्याजासह वसूल करण्याची परवानगी मागितली आहे. जर वरील महसुलातील तफावत ही एका महिन्यात वसूल करण्याची परवानगी मिळाली तर व्याजाची यथायोग्य रक्कम मिळण्याची व्यवस्था करावी. या व्यतिरिक्त महानिर्मितीने मुख्यमंत्री कृषी वाहिनी योजनेसाठी झालेला खर्च , जलभाडेपट्टिवर आकारलेला सेवा कर / 'वस्तु व सेवा कर' व पुनरावलोकन याचिकेवरील (प्रकरण क्र . १८० / २०२० ) आदेशानुसार मान्य केलेले दावे इत्यादि ची मागणी केलेली आहे.

**५. महानिर्मितीने येणे असलेल्या व्याजा सहीत दावा केलेली एकूण रक्कम खालील प्रमाणे**

**तक्ता क्रमांक -४**

| अनु. क्र | तपशील | मुद्दल रक्कम | येणे असलेल्या व्याज आ.व २३-२४ च्या मध्या पर्यन्त (आ.व २३-२४ मध्ये वसूली विचारात घेता) | येणे असलेल्या व्याजा सहित एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | अंतिम समायोजन आर्थिक वर्ष २०२० | ३४५.४४ | ९२.०९ | ४३७.५२ |
| २ | अंतिम समायोजन आर्थिक वर्ष २०२१ | १,०२९.३१ | १८४.२२ | १,२१३.५३ |
| ३ | अंतिम समायोजन आर्थिक वर्ष २०२२ | ५७१.४८ | ५१.१४ | ६२२.६२ |
| ४ | पुनरावलोकन आदेश (प्रकरण क्र. १८०/२०२०) परिणाम (प्रलंबित दायित्व निर्वहन आणि निर्धारित नुकसानभरपाईतील तफावत यांच्या परिणामा सहित) | २८७.९३ | १२७.०४ | ४१४.९७ |
| ५ | मुख्यमंत्री सौर कृषी योजना संबंधित खर्च | १३.७४ | ३.४२ | १७.१६ |
| ६ | जल भाडेपट्टी वर सेवा कर आणि वस्तु व सेवा कर चा दावा (प्रकरण क्रमांक १६८/२०२० आणि १३२/२०२१ मधील आदेशा नुसार) | ३७६.०९ | ४५.३३ | ४२१.४२ |
| ७ | एकूण | २,६२३.९८ | ५०३.२४ | ३,१२७.२२ |

**६. आ.व.२०२३ -२४ आणि आ.व.२०२४-२५ साठी प्रस्तावित संचलन मापदंड सारांश हा खालील प्रमाणे आहे.**

**तक्ता क्र.५ संचलन मापदंड सारांश आ.व.२०२३-२४ आणि आ.व.२०२४-२५ करिता**

| तपशील | उपलब्धता % | सयंत्र भारांक % | सहाय्यकारी विजेचा वापर % | दुय्यम इंधनाचा वापर मि.ली. / युनिट | उष्मांक दर किलो कॅ./युनिट |
|---|---|---|---|---|---|
| भुसावळ- ३ | ८०.८५ | ८०.८५ | १०.९६ | १.४० | २,७८७ |
| चंद्रपूर - ३ ते ७ | ८४.९० | ८४.९० | ७.८० | १.०० | २,६८९ |
| खापरखेडा - ५ | ८५.४१ | ८५.४१ | ९.७० | १.२० | २,६३० |
| कोराडी - ६ , ७ | ८५.४१ | ८५.४१ | ९.०० | २.८१ | २,३५४ |
| नाशिक | ८०.१९ | ८०.१९ | १०.७५ | १.०० | २,७५४ |
| उरण वायू | ३५.३३ | २६.५१ | ३.१० | - | २,३४८ |
| पारस - ३ , ४ | ८४.७१ | ८४.७१ | ९.३० | ०.५० | २,४३० |
| परळी - ६ , ७ | ८४.९६ | ८४.९६ | ९.३० | ०.५० | २,४३० |
| खापरखेडा - ५ | ८५.२३ | ८५.२३ | ६.०० | ०.५० | २,३७५ |
| भुसावळ -४ , ५ | ८४.९६ | ८४.९६ | ६.०० | ०.५० | २,३७५ |
| कोराडी - ८,९,१० | ८४.९७ | ८४.९७ | ६.०० | ०.५० | २,२३० |
| चंद्रपूर - ८ , ९ | ८५.३६ | ८५.३६ | ६.०० | ०.५० | २,३७५ |
| परळी - ८ | ८५.२७ | ८५.२७ | ८.५० | ०.५० | २,४३० |

**७. आ.व.२०२३-२४ आणि आ.व.२०२४-२५ करिता याचिकेतील एकूण वार्षिक महसूलाचा सारांश खालील प्रमाणे.**

**तक्ता क्र.६ महानिर्मिती कंपनीसाठी अंदाजित वार्षिक महसूलाची गरज (रुपये कोटी)**

| तपशील | आ.व. २०२३-२४ | | आ.व. २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|
| | *मंजूर | प्रस्तावित | *मंजूर | प्रस्तावित |
| **अस्थिर आकार** | | | | |
| इंधन खर्च इतर खर्चासहीत | १७,९८४.४५ | २६,८७९.४५ | १८,३८७.५६ | २८,२२३.४३ |
| **क्षमता आकार** | | | | |
| दुरुस्ती व देखभाल विषयक खर्च | २,९४२.३९ | ३,४२३.८० | ३,०२२.८४ | ३,५५८.६१ |
| वेतन पुनर्रचना | २७९.६९ | | २८५.६२ | |
| इतर खर्च | ३४५.९९ | २७७.८७ | ३४५.९९ | २७७.८७ |
| जल आकार | १८३.२८ | ३०६.१९ | १८३.२८ | ३१५.३७ |
| दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज आणि वित्त भार | १,२५०.९५ | १,३५२.९८ | १,०७४.३० | १,४७३.८५ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ६६९.३० | ८७६.३३ | ६७६.८० | १,०६६.२५ |
| घसारा | २,०७०.४७ | २,३१७.४३ | २,०८४.४२ | २,८७९.३८ |
| भाग भांडवलावरील परतावा | १,६४२.०२ | १,७०३.७० | १,६५६.५० | १,९३०.०६ |
| भाडेपट्टी आकार | ५३३.७६ | ५३२.०० | ५२५.५५ | ५२३.८३ |
| आयकर | | - | | - |
| वजा: वीज विक्री सोडून उत्पन्न | ९९.१२ | १३३.०७ | ९९.१२ | १३३.०७ |
| एकूण क्षमता आकार | ९,८१८.७४ | १०,६५७.२२ | ९,७५६.१९ | ११,८९२.१५ |
| एकूण महसुलाची आवश्यकता | २७,८०३.१९ | ३७,५३६.६७ | २८,१४३.७५ | ४०,११५.५८ |

*** बहुवार्षिक वीजदर याचिके मध्ये मंजूर**

**८. आ.व.२०२३-२४ आणि आ.व.२०२४-२५ करिता अंदाजित वार्षिक स्थिर आकार व प्रती केंद्र वीज आकार मंजुरीकरिता चा सारांश खालील प्रमाणे.**

**तक्ता क्र. ७. अंदाजित केंद्रनिहाय अस्थिर आकार (रु. / kWh)**

| तपशील | आ.व. २०२३-२४ | | आ.व. २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|
| | *मंजूर | दावा केलेले | *मंजूर | दावा केलेले |
| भुसावळ- ३ | ४.१९९ | ४.५०६ | ४.२९८ | ४.७३१ |
| चंद्रपूर - ३ ते ७ | २.७२ | ३.८७२ | २.७८३ | ४.०६६ |
| खापरखेडा - | ३.०१६ | ३.९३६ | ३.०८७ | ४.१३३ |
| कोराडी - ६, ७ | ३.३९९ | ३.६२३ | ३.४८९ | ३.८०५ |
| नाशिक | ३.६६ | ५.०६७ | ३.७५३ | ५.३२१ |
| उरण वायू | २.९३२ | ८.५५७ | ३.०२ | ८.९८५ |
| पारस -३ , ४ | ३.२२७ | ३.२९२ | ३.३११ | ३.४५६ |
| परळी -६ , ७ | ४.३६ | ४.४९३ | ४.४८२ | ४.७१७ |
| खापरखेडा - ५ | २.६४९ | ३.७८२ | २.७१३ | ३.९७१ |
| भुसावळ -४ , ५ | ३.५२४ | ४.१३५ | ३.६१५ | ४.३४२ |
| कोराडी - ८,९,१० | २.४५७ | ३.४६४ | २.५१८ | ३.६३८ |
| चंद्रपूर - ८, ९ | २.६३६ | ३.८४८ | २.७ | ४.०४० |
| परळी -८ | ४.१७४ | ४.६२३ | ४.२९ | ४.८५४ |

*** बहुवार्षिक वीजदर याचिके मध्ये मंजूर**

**तक्ता क्र. ८. अंदाजित केंद्रनिहाय वार्षिक स्थिर आकार (रुपये कोटी)**

| तपशील | आ.व. २०२३-२४ | | आ.व. २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|
| | *मंजूर | दावा केलेले | *मंजूर | दावा केलेले |
| भुसावळ- ३ | १६९.११ | १७६.२७ | १७४.६५ | १८१.९३ |
| चंद्रपूर - ३ ते ७ | १०४०.६४ | १२१९.०८ | १०५६.१८ | १४६४.०५ |
| खापरखेडा - | ५९३.३३ | ७०६.१५ | ५९८.४० | ७९१.७५ |
| कोराडी - ६, ७ | ३९३.९० | ३३१.९८ | ४०४.८० | ३६२.८९ |
| नाशिक | ५००.५६ | ४९०.२७ | ४९७.२९ | ५८४.२५ |
| उरण वायू | २१२.८९ | २२६.१४ | २१३.६५ | ३८०.५१ |
| पारस - ३, ४ | ४६०.२५ | ५४३.३१ | ४६४.१६ | ६७०.५५ |
| परळी - ६, ७ | ४४९.३३ | ४७०.१८ | ४५३.०७ | ६३०.६० |
| खापरखेडा - ५ | ५३४.२७ | ५७३.६१ | ५२३.६८ | ६२३.४२ |
| भुसावळ -४, ५ | १०५२.४४ | १०६७.५८ | १०२९.०४ | ११३९.५७ |
| कोराडी - ८,९,१० | २०९७.६८ | २४१७.८७ | २०५५.१८ | २५५९.७२ |
| चंद्रपूर - ८, ९ | ११०६.०५ | १२१५.०९ | १०८७.९२ | १२४७.९७ |
| परळी - ८ | ३८१.८५ | ३९६.९६ | ३७६.५५ | ४११.०३ |
| लघु जल विद्युत केंद्र | २९१.६२ | १३३.६९ | २९४.९७ | १४६.६९ |
| भिरा | | ७.७ | | ७.९६ |
| कोयना | | १३३.०१ | | १४८.५९ |
| तिल्लारी | | १६.६२ | | १७.१६ |
| एकूण | ९२८३.९२ | १०१२५.५२ | ९२२९.५५ | ११३६८.६३ |

***बहुवार्षिक वीजदर याचिके मध्ये मंजूर**

**९. महानिर्मिती कंपनीने प्रस्तावित भुसावळ संच क्रमांक ६ च्या तात्पुरता वीजदर साठी माननीय आयोगाची मंजूरी मिळण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. त्याबाबतचा तपशील खालील प्रमाणे.**

**तक्ता क्रमांक-९ प्रस्तावित भुसावळ संच क्रमांक ६ करिता चा तात्पुरता वीजदर**

| अनु. क्र | तपशील | तात्पुरता वीजदर | |
|---|---|---|---|
| | | आ.व.२०२३-२४ | आ.व.२०२४-२५ |
| १ | क्षमता(स्थापित) आकार (रुपये कोटी) | १०६५.८४ | ११४५.५८ |
| २ | वीज आकार (रु. / kWh) | २.८०९ | २.८६५ |

**१०. खालील दस्तऐवजांच्या प्रती महानिर्मिती कंपनीच्या खालील कार्यालयात लेखी विनंती केल्यास मिळू शकतील-**

अ) प्रस्तावाचा कार्यकारी सारांश (इंग्रजी किवा मराठीत), विनामुल्य.

ब) विनंती याचिकेचा तपशीलवार दस्तावेज (इंग्रजी मध्ये), सीडी / पेन ड्राइव सहित (एकूण रु.१५०/-रोखीने अथवा "Maharashtra State Power Generation Company Limited" यांच्या नावाने देय होणाऱ्या धनाकर्ष द्वारे प्रदान केल्यास.)

१) विनंती याचिकेचा तपशीलवार दस्तावेज (इंग्रजी मध्ये) (एकूण रु.१००/-) प्रदान केल्यास.

२) विनंती याचिकेचा तपशीलवार दस्तावेज सीडी / पेन ड्राइव स्वरूपात (इंग्रजी मध्ये) (एकूण रु.५०/-) प्रदान केल्यास.

**मुख्य कार्यालय :**

मुख्य अभियंता, नियामक आणि वाणिज्यिक विभाग,
म. रा. वीज निर्मिती कंपनी मर्यादित,३ रा मजला, प्रकाशगड, वांद्रे(पूर्व) मुंबई - ४०००५१

**अन्य ठिकाणची कार्यालये :-**

१. मुख्य अभियंता, वायुविद्युत केंद्र, बोकडवीरा, उरण जिल्हा रायगड पिन न.४००७०२,एसटीडी कोड (०२२) फोन नं.२७२२२२८५
२. मुख्य अभियंता, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र,उर्जा भवन, पोस्ट - उर्जा नगर जिल्हा चंद्रपूर पिन न. ४४२४०४,एसटीडी कोड (०७१७२) फोन नं. २२०१५५ -५९
३. मुख्य अभियंता, कोराडी औ.वि.केंद्र, कोराडी उर्जा भवन, प्रशासकीय इमारत, कोराडी नागपूर पिन नं. ४४११११,एसटीडी कोड (०७१०९) फोन नं. २६२१४१-४६
४. मुख्य अभियंता, खापरखेडा औ.वि.केंद्र, पोस्ट- खापरखेडा , जिल्हा नागपूर पिन नं. ४४११०२, एसटीडी कोड (०७११३), फोन नं. २६८१६८-७०
५. मुख्य अभियंता, परळी औ.वि.केंद्र, परळी वैजनाथ जिल्हा बीड पिन नं. ४३१५२०,एसटीडी कोड (०२४४६),फोन नं. २२२३५७ - ६०
६. मुख्य अभियंता,भुसावळ औ.वि.केंद्र, दीपनगर, (भुसावळ) जिल्हा जळगाव पिन नं.४२५३०७, एसटीडी कोड (०२५८२),फोन नं. २५००१२ /८४ /८८ / ७७
७. मुख्य अभियंता, नाशिक औ.वि.केंद्र, प्रशासकीय इमारत, पोस्ट- एकलहरे - नाशिक पिन नं.४२२१०५, एसटीडी कोड (०२५३),फोन नं.२८१०२९१ -९९
८. मुख्य अभियंता, पारस औ.वि.केंद्र, विद्युत नगर, पारस, जिल्हा अकोला पिन नं.४४४१०९, एसटीडी कोड (०७२५७), फोन नं.२३४८४८,
९. अधिक्षक अभियंता (निर्मिती), लघु जलविद्युत मंडळ, ५ वा मजला, प्रकाश भवन प्लॉट न.१०६, सेनापती बापट मार्ग, पुणे पिन नं.४११०१६, एसटीडी कोड (०२०), फोन नं. २५६३७६१०
१०. उप मुख्य अभियंता, (चाचणी, उपकरण योजना व नियंत्रण), विद्युत भवन, काटोल रोड, नागपूर. पिन नं.४४००१३, एसटीडी कोड (०७१२), फोन नं.२५९११५१
११. मुख्य अभियंता कोयना जल विद्युत केंद्र,पोफळी तालुका - चिपळूण, जिल्हा-रत्नागिरी, पिन-४१५६०१ एसटीडी कोड (०२३५५) फोन नं-२३५०११

**११.** महानिर्मिती कंपनीने या जाहीर सुचनेद्वारे उक्त याचिके संदर्भात जनतेकडून सूचना आणि हरकती मागवाव्यात, असे मा. वीज नियामक आयोगाने निर्देश दिलेले आहेत. या जाहीर सुचनेला प्रतिसाद देण्यासाठी ज्या व्यक्तींना आपल्या हरकती/सूचना सादर करावयाच्या असतील त्यांनी आपल्या लेखी हरकती / सूचना मराठी किंवा इंग्रजी भाषेत माननीय वीज नियामक आयोगाच्या संकेतस्थळावर (www.merc.gov.in/e-public consultation)या ***'E-public consultation'*** या टॅब वर अपलोड करू शकतात. या सुविधेचा वापर करण्यास जर काही अडचण येत असल्यास संबंधितांनी माननीय वीज नियामक आयोगाच्या कार्यालयात भ्रमणध्वनि क्र. ८९२८०७१५२२ अथवा suggestions@merc.gov.in या इमेल आयडी वर सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०६.०० वाजेच्या दरम्यान कामकाजाच्या दिवसांत संपर्क साधावा .

**१२.** ज्या व्यक्तींनी ***'E-public consultation'*** या टॅब वर हरकती/सूचना अपलोड केलेल्या असतील, त्यांनी कोणतीही मुद्रित/छापील प्रत सादर करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तींना electronic संपर्क साधने उपलब्ध नसतील त्यांनी आपल्या हरकती/सूचना छापील प्रतीत पुढील पत्त्यावर पाठवावे; **माननीय सचिव, महाराष्ट्र वीज नियामक आयोग, १३ वा मजला, सेंटर क्र.१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा, मुंबई. ४००००५ या पत्त्यावर सायंकाळी ५ वाजे पर्यन्त दिनांक: १९ जानेवारी, २०२३ पर्यंत** मिळतील अशा बेताने व श्री.विजय पांडुरंग राठोड, मुख्य अभियंता, नियामक आणि वाणिज्यिक विभाग, महानिर्मिती [महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनी लिमिटेड], ३ रा मजला, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व) मुंबई - ४०००५१, ई-मेल : rcgen@mahagenco.in यांना प्रत दिल्याच्या पुराव्यासहित आणि प्रेषकाचे संपूर्ण नाव, टपालाचा पत्ता व ई-मेल (असल्यास) पत्ता यांसहित पाठवाव्यात. त्यानंतर आलेल्या हरकती/सूचनांचा विचार केला जाणार नाही.

**१३. दिनांक: १९ जानेवारी, २०२३** पर्यंत प्राप्त झालेल्या प्रत्येक हरकती / सूचना / अभिप्राय यांना महानिर्मिती कंपनीकडून तीन दिवसांत म्हणजेच **दिनांक: २२ जानेवारी, २०२३** पूर्वी उत्तरे देण्यात येतील. कंपनीतर्फे देण्यात आलेल्या उत्तरावर आक्षेप, त्यांची प्रत्युत्तरे किंवा उत्तरे जाहीर सुनावणीच्या वेळी किंवा उशिरात उशिरा **दिनांक:- ३ फेब्रुवारी, २०२३** पर्यंत दाखल करू शकतात.

**१४.** प्रेषकास / हरकतदारास आयोगापुढील ई -जाहीर सुनावणी दरम्यान व्यक्तिश: उपस्थित राहण्याची व बोलण्याची इच्छा असल्यास, त्याने / तिने हरकत / सूचना सादर करताना तसे नमूद करावे. अशा परिस्थितीत प्रेषकाचा दूरध्वनी क्रमांक आणि ईमेल आय डी नमूद करणे बंधनकारक राहील. दिनांक **३१ जानेवारी, २०२३ सकाळी ११** वाजता आयोजित व्हिडियो कॉन्फरन्सिंग द्वारे होणाऱ्या ई -सुनावणी दरम्यान प्रेषकाला बोलण्याची संधी देण्याचे/नाकारण्याचे संपूर्ण अधिकार माननीय वीज नियामक आयोगास राहतील, तसेच त्या संदर्भात वेगळी सूचना दिली जाणार नाही.

**१५.** ई -सुनावणी दरम्यान उपस्थितांना याचिकेच्या ई -सुनावणी साठी पालन करण्यासाठी माननीय वीज नियामक आयोगाने दिनांक १४ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रकाशित केलेल्या कामकाजाची पद्धती आणि शिष्टाचार विनियम यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

**१६.** याचिकेचे तपशीलवार दस्तऐवज आणि कार्यकारी सारांश महानिर्मिती कंपनीच्या वेबसाईटवर (www.mahagenco.in → Navigation → Regulatory & Commercial → Regulatory petitions) विनामुल्य डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे.

सही

नांव : **श्री विजय पांडुरंग राठोड**
पद : **मुख्य अभियंता (नियामक व वाणिज्यिक विभाग)**
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

ठिकाण: मुंबई
दिनांक: २९ डिसेंबर, २०२२